# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**
**एल ००२, संघवी इस्टेट, नीवन आरटीओ रोड**
**खडकपाडा, सिनेमॅक्स जवळ, कल्याण (प)**
**जि.ठाणे ४२१ ३०१**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (अ.बां.नि.)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
शंकरराव चौक कल्याण (प),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (अ.बां.नि.)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
शंकरराव चौक कल्याण (प),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३.६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ८.१.२०२४ | ८.२.२०२४ | २८.२.२०२४ | २०.३.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि.२४.४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३.६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. तुषार राजाराम सोनवणे, सहा. आयुक्त, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. अवधूत तावडे, उपायुक्त, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"*(कल्याण डोंबिवली मनपातील महारेरा घोटाळयामधील ६५ विकासकांवर गुन्हा दाखल करुन त्याची माहिती प्रवर्तन निदेशालय यांनी देण्यासाठी तयार केलेल्या संपुर्ण संचिकेची छायांकित प्रत मिळण्याबाबत.)*"

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अबांनि) यांनी अपिलार्थी यांना दिलेली माहिती योग्य असल्याने सदरचे प्रथम अपिलीय अर्ज निकाली काढण्यात येत आहे.*" असा निर्णय दिलेला आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.८.२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे नाकारली आहे. माहिती नाकारताना त्यांना असे कळविले आहे की, आपण माहिती अर्जात मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ज) नुसार देता येणार नाही.

आपिलार्थी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, सदरच्या प्रकरणातील तक्रार ही त्यांनीच केली आहे. इनफोर्समेंट डायरेक्टर यांचेकडे आपणच तक्रार केली होती. या प्रकरणात या तक्रारीच्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून सदर संचालनालयाने अहवाल मागितला होता. जो अहवाल कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने प्रवर्तन निदेशालयाला पाठविला आणि तो ज्या संचिकेमधून पाठविण्यात आला त्यां संपूर्ण संचिकेची आपण माहिती मागितली होती. सदर ६५ विकासकांनी बांधलेल्या इमारती या ज्यावेळी अहवाल तयार करण्यात आल्या त्यावेळी ब-यापैकी रिक्त होत्या. सदर चौकशी सुरू असताना सदर विकासकांनी त्या इमारती खरेदीदारांना विकून त्याचा ताबा दिला. ही जी वस्तुस्थिती आहे ती

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने प्रवर्तन निदेशालयाला पाठविलेल्या अहवालामध्ये अंतर्भूत आहे. त्यामुळे आपल्याला त्या अहवालाच्या प्रतीची आवश्यकता आहे.

अपिलार्थी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, सदर प्रकरणाबाबत त्यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून या जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने सदरच्या इमारती ३ महिन्याच्या आंत तोडण्याचे आदेश दिले आहेत. हे प्रकरण आपणच तडीस लावत असल्याने आपणास ही माहिती उपलब्ध करून दयावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. सोनम देशमुख, सहा. आयुक्त (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी ज्या दि.८.२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती नाकारली आहे त्यामध्ये त्यांनी माहिती नाकारताना कोणतीही कारणमीमांसा दिलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (८) (१) (ज) च्या तरतुदी या प्रकरणी कशा आणि का लागू होतात यासंबंधी त्यांनी त्यांच्या पत्रामध्ये काही नमूद केलेले नाही. त्यामुळे या प्रकरणात कोणताही निर्णय घेणे आयोगास योग्य वाटत नाही. सबब विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. सोनम देशमुख, सहा. आयुक्त (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (८) (१) (ज) च्या तरतुदी या प्रकरणात का लागू केल्या याबाबतचे त्यांचे सविस्तर लेखी म्हणणे पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचसोबत अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीदेखील आयोगाच्या अवलोकनासाठी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. सोनम देशमुख, सहा. आयुक्त (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम (८) (१) (ज) च्या तरतुदी या प्रकरणात का लागू केल्या याबाबतचे त्यांचे सविस्तर लेखी म्हणणे आयोगाकडे दि.१४.८.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावे. त्याचसोबत अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीदेखील आयोगाच्या अवलोकनासाठी दि.१४.८.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावी.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.८.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जून, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**

**सुनावणी दिनांक १४.८.२०२५ (In continuation of order dt.३.६.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.तुषार सोनावणे, सहा. आयुक्त, समक्ष उपस्थित आहेत. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. सोनम देशमुख, सहा.आयुक्त (अ.बां.नि., कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या ऑनलाईन उपस्थित आहेत.

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. सोनम देशमुख, सहा. आयुक्त (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ज) च्या तरतुदीनुसार "*ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रीयांमध्ये अडथळा येईल अशी माहिती*" अशी माहिती पुरविण्याचे आबंधन राहणार नाही असे नमूद आहे. त्या अनुषंगाने अर्जदार श्री. संदिप पाटील यांनी मागितलेल्या प्रकरणाबाबतची माहिती त्यांना दिली असती तर इतर अनेक लोकांनी देखील माहिती मागितली असती व त्यांना ही ती देय असती. या प्रकरणात प्रवर्तन निदेशालय

(Enforcement Directorate) व SIT अशा उच्च स्तरावर चौकशी चालू असताना इमारती बाबत संकलित केलेली माहितीचा इतर नागरिकांनी गैर वापर केल्याची शक्यता नाकारता येत नव्हती. तसेच या माहितीचा वापर करून यात समावेश असलेल्या लोकांनी स्वत:च्या बचावासाठी अजून खोटी कागदपत्रे तयार करण्याची शक्यता पण नाकारता येत नव्हती. म्हणून माहिती देण्यात आली नाही.

अपिलार्थी यांनी या संदर्भात असा युक्तिवाद केला की, त्यांनी या संदर्भात जेव्हा तक्रार केली होती त्यावेळी प्रवर्तन निदेशालयाला (Enforcement Directorate) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे अहवाल सादर केला होता. त्यावेळी त्या ६५ इमारतींचे काम पूर्ण झाले नव्हते. चालू होते. तसेच त्या ६५ इमारतीमध्ये लोक निवास करत नव्हते त्यावेळीसुध्दा कल्याण डोंबिवली महानगरपालिका या इमारतीवर कारवाई करू शकत होती. या इमारतींची त्यावेळीबाबतची स्थिती प्रवर्तन निदेशालयाला (Enforcement Directorate) पाठविलेल्या अहवालामध्ये नमूद असल्यामुळे त्या अहवालाची आपणास आवश्यकता आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्याने अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रीयांमध्ये अडथळा होऊ शकेल याबाबतचा निर्णय प्रवर्तन निदेशालयाचे अधिकारी घेऊ शकतात. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उघड करण्यास प्रवर्तन निदेशालयाला याबाबत विचारणा करून त्यांच्याकडून आलेल्या उत्तराची प्रत आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उघड केल्याने अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रीयांमध्ये अडथळा होऊ शकेल याबाबतचा निर्णय प्रवर्तन निदेशालयाचे अधिकारी घेऊ शकत असल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. तुषार सोनावणे, सहा. आयुक्त, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी सदरची माहिती उघड करण्यास प्रवर्तन निदेशालयाला याबाबत विचारणा करून त्यांच्याकडून आलेल्या उत्तराची उत्तराची प्रत आयोगाकडे दि.३०.१०.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावी.**
२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.१०.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**

**सुनावणी दिनांक ३०.१०.२०२५** (In continuation of order dt.१४.८.२०२५)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी समक्ष तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या ऑनलाईन उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, आयोगाचे आदेश त्यांना दि.१४.१०.२०२५ रोजी प्राप्त झाले त्यानंतर त्यांनी दि.१८.१०.२०२५ रोजी प्रवर्तन निदेशालयाला हे पत्र पाठविलेले आहे. तथापि, त्यांचेकडून अद्याप या संदर्भात उत्तर प्राप्त झालेले नाही. सबब, प्रस्तुत प्रकरण पुढील तारखेवर ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**

**सुनावणी दिनांक ११.१२.२०२५ (In continuation of order dt.३०.१०.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी समक्ष तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या ऑनलाईन उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे यांनी असे तोंडी निवेदन केले की, सदर माहिती उघड केल्यास अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रीयेमध्ये अडथळा निर्माण होऊ शकेल याबाबत अभिप्राय मागविण्यासाठी प्रवर्तन निदेशालय यांच्याकडे दि.३१.१०.२०२५ व दि.२६.११.२०२५ रोजी पत्रव्यवहार केला आहे. तथापि, त्यांचेकडून कोणतेही उत्तर अद्यापपर्यंत त्यांना प्राप्त झाले नाही. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पत्रव्यवहाराच्या प्रतीसह आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ डिसेंबर, २०२५

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**

**सुनावणी दिनांक १२.२.२०२६ (In continuation of order dt.११.१२.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि,विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी त्यांचा लेखी अहवाल आयोगास सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार दि.३०.१०.२०२५ दि.२६.११.२०२५ व दि.१०.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्रवर्तन निदेशालय यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु, त्यांच्याकडून अद्याप कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी एक स्मरणपत्र प्रवर्तन निदेशालय यांना देणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. ७.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**सही/-**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२६

**अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**

**सुनावणी दिनांक ७.४.२०२६ (In continuation of order dt.१२.२.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी समक्ष उपस्थित आहेत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या ऑनलाईन उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी असे निवेदन केले की, त्यांनी प्रवर्तन निदेशनालय यांचेशी पत्रव्यवहार केला आहे. तथापि, त्यांच्याकडून अद्याप कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.

या प्रकरणातील वस्तुस्थिती अशी आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.८.१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांना, "*कल्याण डोंबिवली मनपातील महारेरा घोटाळयामधील ६५ विकासकांवर गुन्हा दाखल करुन त्याची माहिती प्रवर्तन निदेशालय यांनी देण्यासाठी तयार केलेल्या संपूर्ण संचिकेची छायांकित प्रत मिळण्याबाबत.*" अशा माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती त्यांच्या दि.८.२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना नाकारली आहे. त्यांनी ही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ज) नुसार देता येणार नाही असे अपिलार्थींना कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी प्रथम अपिलिय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.२०.३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अबांनि) यांनी अपिलार्थी यांना दिलेली माहिती योग्य असल्याने सदरचे प्रथम अपिल निकाली काढण्यात येत आहे." असे आदेश पारित केले. प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या या आदेशाविरूध्द सदरचे द्वितीय अपिल दाखल करण्यात आले आहे.

सुनावणी दरम्यान अपिलार्थींनी असे निवेदन केले की, सदर प्रकरणामध्ये त्यांनीच इनफोर्समेंट डायरेक्टर यांचेकडे तक्रार केली आहे. आपल्या या तक्रारीच्या अनुषंगाने सदर इनफोर्समेंट डायरेक्टर यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून अहवाल मागितला होता. असा अहवाल कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने या संचिकेमधून पाठविलेला असून या संपूर्ण संचिकेची माहिती त्यांनी मागितली आहे. सदर ६५ विकासकांनी बांधलेल्या इमारती या ज्यावेळी असा अहवाल तयार करण्यात आला होता त्यावेळी ब-यापैकी रिक्त होत्या. ही चौकशी सुरू असताना सदर विकासकांनी त्या इमारती खरेदीदारांना विकून त्याचा ताबा दिला. ही जी वस्तुस्थिती आहे ती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने प्रवर्तन निदेशालयाला पाठविलेल्या अहवालामध्ये अंतर्भूत आहे. त्यामुळे आपणास त्या अहवालाच्या प्रतीची आवश्यकता आहे.

सदर प्रकरणात अपिलार्थींनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केलीअसून या याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने सदररच्या इमारती ३ महिन्यांमध्ये तोडण्याचे आदेश दिले आहेत. हे प्रकरण आपणच तडीस नेले असल्याने आपणास माहिती देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

अपिलार्थी यांना सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ज) नुसार नाकारण्यात आली असल्याने व या प्रकरणी तपास प्रवर्तन निदेशनालय करत असल्याने सदर माहिती उघड करण्यास त्यांचा आक्षेप आहे काय की, जेणेकरून त्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रीयांमध्ये अडथळा येईल याबाबी नमूद आहेत म्हणून सदरची माहिती आवश्यक आहे म्हणून जन माहिती अधिकारी यांनी प्रवर्तन निदेशालयाशी पत्रव्यवहार करून त्यांची हरकत जाणून घेण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी

दि.३१.१०.२०२५, दि.२६.११.२०२५, दि.१०.१२.२०२५ व दि.२७.२.२०२६ रोजी पत्र लिहून प्रवर्तन निदेशालय यांची हरकत असल्यास त्यांना विनंती केली होती. तथापि, प्रवर्तन निदेशालय यांचेमार्फत कोणतेही उत्तर या संदर्भात दिलेले नाही असा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला आहे.

यावरून प्रवर्तन निदेशालयाला सदर माहिती उघड करण्यास आक्षेप दिसून येत नाही. तथापि, सदर माहिती उघड करण्यापूर्वी त्याचे अवलोकन करणे आवश्यक असल्याने जन माहिती अधिकारी यांनी सदरची नस्ती आयोगाच्या अवलोकनार्थ पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**अपिल क्रमांक : के.आर-१४५०/२०२४**

**अपिलार्थी, श्री.संदिप पांडुरंग पाटील**

**सुनावणी दिनांक १४.५.२०२६ (In continuation of order dt.७.४.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण या उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.सुषमा मांडगे, सहा. आयुक्त, (अबांनि), कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी प्रवर्तन निदेशालयास पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत सुनावणी दरम्यान आयोगाच्या निदर्शनास आणली. ती अभिलेखावर घेण्यात आली आहे. सबब, सदरचे प्रकरण आदेशाकरीता बंद करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ मे, २०२६